नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २७/०४/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

## फसवणुक

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत बसस्टाप मौदा येथे दिनांक २६/०३/२०२२ चे १७.०० वा. ते दिनांक २६/०३/२०२२ चे १७.३० वा. दरम्यान राहुल भाई नावाचा आरोपीने टेलीग्राम अप्लीकेशन माध्यमाने फिर्यादी नामे– रोहीत गणपत मदनकर, रा. बसस्टॉप मौदा याच्या कडून ४७,४०८/–रू. बिटकॉईन क्षेत्रात पैसे कमावून डबल करून देतो असे सांगुन फोन पेद्वारे मागितले. फिर्यादीने त्याला फोन पे वर पैसे दिल्यानंतर आरोपी कडुन फिर्यादीने पैसे परत मागितले परंतु आरोपीने पैसे परत केले नाही व ऑनलाईन द्वारे आरोपीने फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक हेमंतकुमार खराबे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**.पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील राजकमल रिसोर्ट समोर, रामटेक येथे दिनांक २५/०४/२०२२ चे २०.३० वा. ते २२.०० वा. सुमारास १) नंदु लक्ष्मण सोनवाने, वय ४२ वर्ष, २) राहुल राजु भोस्कर वय २५ वर्ष दोन्ही रा. वार्ड धर्मापुरी त मौदा हे त्यांच्या एमएच– ४०/वी– ७५५४ कमांकाच्या मोटरसायकलने रामटेक कडुन घोटीटोक कढे जात असतांना एमएच– ४०/केआर– १४५३ क्रमांकाच्या अल्टो कारच्या चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात नंदु सोनवाने व राहुल भोस्कर हे दोघेही गंभीर जखमी मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संदीप नंदुजी सोनवाने, वय २१ वर्ष, रा.वार्ड क्र. २ धर्मापुरी ता. मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अडामे मो. नं. ९९३७४००८७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर